माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १५४०/२०२१**

**अपिलार्थी, श्री. सुरेश गुलाबरावजी घेर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य स्वच्छता अधिकारी,**
नेहरु नगर झोन क्र.५, महानगरपालिका नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
नेहरु नगर झोन क्र.५, महानगरपालिका नागपूर

**अंतरिम आदेश दिनांक : १३.०३.२०२३**
**अंतीम आदेश दिनांक : २०.०८.२०२४**

**निर्णय**

अपिलार्थी श्री. सुरेश गुलाबरावजी घेर यांनी **दिनांक १९.०७.२०२१** रोजी आयोगासमोर सादर केलेल्या व्दितीय अपीलावर आयोगाने दिनांक १३.०३.२०२३ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारीत केले आहे.

"अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०४.२०२१ रोजी आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, तसेच नेहरु नगर झोन क्रं. ५ यांना केलेल्या तक्रारीत अंतुजी नगर, प्रभाग क्रमांक २६-अ, भांडेवाडी, रेल्वे स्टेशन रोड, शितला माता मंदीर परिसर येथे आपल्या घरगुती बोरींगचा वापर करुन सार्वजनिक पाण्याचा प्लास्टीक पाईपद्वारे घरापुढील सार्वजनिक रस्त्यावर मोठ्या प्रमाणात सडा टाकुन चिखल करीत असते. परिणामी त्यापासून उत्पन्न होत असलेला पाण्याचा लोंढा सार्वजनिक रस्त्यावरुन कोठल्या कोठे वाहात जावून रस्त्यावर जागोजागी चिखल निर्माण होऊन येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांची व त्या ठिकाणी राहणाऱ्या शेजाऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. मोठ्या प्रमाणात होत असलेल्या नेहमीच्या पाणी वापरामुळे सार्वजनिक रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून रस्ता खराब झालेला आहे. याबाबतच्या केलेल्या तक्रारीवर कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नसुन दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जावर कुठलाच प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. तसेच प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यात आली नसल्यामुळे अद्याप अपिलार्थीस माहिती अप्राप्त आहे. ही बाब अतिशय गंभीर असुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार अधिकतम शास्ती का लावण्यात येवू नये, याचा स्वंयस्पष्ट खुलासा त्यांनी आयोगास दिनांक ०६.११.२०२३ रोजी व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये, याचा स्वंयस्पष्ट खुलासा त्यांनी आयोगास दिनांक ०६.११.२०२३ रोजी व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. दरम्यान विद्यमान आरोग्य अधिकारी तसेच

सहाय्यक आयुक्त नेहरु नगर झोन यांनी दिनांक ०७.०४.२०२१ रोजी अपिलार्थी यांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जबाबदार अधिकाऱ्या मार्फत देखील चौकशी करुन जर वरील तक्रार अर्जामध्ये तथ्य आढळुन आल्यास त्यावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करुन त्याचा अनुपालन अहवाल पुढील सुनावणी दरम्यान सादर करावा.”

उपरोक्त आदेशास अनुसरुन आयोग कार्यालयातून दिनांक ३१.०७.२०२४ रोजी सुनावणी नोटीस निर्गमित करुन संबंधितांना दिनांक २०.०८.२०२४ रोजी स्वंयस्पष्ट खुलाश्यासह उपस्थित राहण्याबाबत सुचीत करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने आज दिनांक २०.०८.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य स्वच्छता अधिकारी, श्री. विठोबा एन. रामटेके आयोगासमोर व्यक्तीश: उपस्थित आहेत.

प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आयोगाकडे दिनांक १३.०३.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत अंतुजी नगर, प्रभाग क्रमांक २६-अ, भांडेवाडी, रेल्वे स्टेशन रोड, शितला माता मंदिर परिसर येथे घरगुती बोरींगचा वापर करुन सार्वजनिक पाण्याचा मोठया प्रमाणात अपव्यय होत असून त्यामुळे सार्वजनिक रस्त्यावर जागोजागी चिखल निर्माण होऊन येणाऱ्या-जाणाऱ्या नागरीकांची व त्या ठिकाणी राहणाऱ्या शेजाऱ्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होते. यासंदर्भात केलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल अपिलार्थी यांनी मागितली असता, त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या नेहरु नगर झोनच्या वतीने यात प्रत्यक्षात कार्यवाही करण्यात आलेली असून तेथे सिमेंट रोडचे बांधकाम करण्यात आले असून स्ट्राग लाईन देखील टाकण्यात आलेली आहे. वरील प्रश्नाचे/तक्रारीचे प्रत्यक्षात निराकरण करण्यात आले असल्याचे प्राधिकरणाच्या वतीने नमूद केले आहे. ही बाब लक्षात घेता तसेच यात निर्देशीत केल्याप्रमाणे आरोग्य अधिकारी तसेच सहायक आयुक्त नेहरु नगर झोन यांनी अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जावर नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही देखील केली असल्यामुळे प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तूत प्रकरण अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २०.०८.२०२४

जावक क्रमांक 7159 दिनांक 4 OCT 2024